(अपराध क्र.१२६/२०२४)
(निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क कणकवली)
सीएनआर.क्र.MHSI080000552025

## :: न्या य नि र्ण य ::

**(पारीत दि. )**

| | |
|---|---|
| **अभियोगपक्ष** | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क कणकवली,<br>ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग. |
| श्री.ए.ए.उल्हाळकर, विद्वान सहा.अभियोक्ता | |
| **आरोपी** | रविकांत अनंत तांबे,<br>वय – ४३ वर्षे,<br>रा.– नाटळ, बौध्दवाडी, घर क्र.१०४,<br>ता.–कणकवली, जि.–सिंधुदुर्ग. |
| श्री.पी.बी.सावंत विद्वान अधिवक्ता. | |

| | |
|---|---|
| गुन्हा दिनांक – | १५/११/२०२४ |
| गुन्हा दाखल दिनांक – | १५/११/२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक – | २२/०१/२०२५ |
| प्रतिकथन निश्चित केल्याचा दिनांक – | ११/०७/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक – | ०५/११/२०२५ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक – | – |
| न्यायनिर्णय पारीत दिनांक – | ०९/०६/२०२६ |
| शिक्षा सुनावली असल्यास दिनांक – | – |

## :: आरोपीचा तपशील ::

| आ.क्र. | आरोपीचे नाव | अटक दि. | जामिन वर मुक्त केल्याचा दि. | दोषारोप | निर्दोष /शिक्षा | शिक्षा | भा.ना.सु.सं. कलम ४६८ साठी आरोपी कैद कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | रविकांत अनंत तांबे | – | ०४/०३/ २०२५ | महा. दारुबंदी. अधि.कलम ६५ई प्रमाणे | निर्दोष | – | – |

१. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचे युक्तिवाद ऐकले. झालेला पुरावा वाचल्यानंतर खालील मुद्दे उपस्थित झाले त्याच्या निष्कर्षाची कारणे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.१५/११/२०२४ रोजी नाटळ, बौध्दवाडी, ता.कणकवली येथे आरोपी हनी ब्लेंड ब्रॅण्डी च्या १८० मिली मापाच्या एकूण १३३ सीलबंद बाटल्या, विना परवाना चोरटी विक्री व्यवसाय करण्यासाठी बाळगुन होता, असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | .... नाही. |
| २. | अंतिम आदेश ? | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते. |

:: **का र ण मि मां सा** ::

२. आरोपी विरुध्द गुन्हा शाबित करण्याकरिता खालील पुरावा नोंदवला आहे.

| **मौखिक पुरावा** | | | |
|---|---|---|---|
| **सा.क्र.** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** | **निशाण** |
| सा.क्र.०१ | स्नेहल सुभाष कुवेसकर | फिर्यादी | नि.क्र.०६ |
| सा.क्र.०२ | सल्लाउद्दीन अब्दुल रहेमान खान | पंच | |
| **कागदोपत्री पुरावा** | | | |
| ०१. | फिर्याद | नि.क्र.पी१/पीडब्ल्यू१ | |
| ०२. | पंचनामा | नि.क्र.पी२/पीडब्ल्यू२ | |

३. सदर प्रकरणामध्ये आरोपीचा भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५१ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आला. आरोपीने त्याच्याविरुध्द खोटी केस असल्याचा बचाव घेतला

आहे.

**<u>मुद्दा क्र. १ करीताः–</u>**

**४.** साक्षीदार क्र. १ स्नेहल कुवेसकर या प्रकरणातील फिर्यादी आहेत. त्यांच्या सरतपासात असे आले आहे की, दि.१५/११/२०२४ रोजी त्या निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, कणकवली येथे नेमणुकीस होते. त्यादिवशी विश्वसनीय बातमी मिळाली की, नाटळ, बौध्दवाडी, ता.कणकवली येथे आरोपी त्याचे राहते घरी दारुची बेकायदेशीरपणे दारू विक्री करत आहे. त्या बातमीवरून ते दुय्यम निरीक्षक, इतर स्टाफ व दोन पंच असे घटनास्थळी जाऊन घर क्र.१०४ च्या मागील मोकळ्या पडवीत छापा घातला असता आरोपी आपल्या पुढ्यात तागाची पिशवी घेऊन बसलेला दिसला. सदर पिशवीची पंचांसमक्ष खात्री केली असता, त्यात गोवा बनावटीच्या हनी ब्लेंड ब्रॅण्डीच्या १८० मिली मापाच्या १३३ सीलबंद बाटल्या मिळून आल्या होत्या. आरोपीस त्याचे नाव गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव रविकांत अनंत तांबे असे सांगितले. दुय्यम निरीक्षक यांनी दोन पंचांसमक्ष घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला. दुय्यम निरीक्षक यांनी दोन १८० मिली मापाच्या बाटल्या नमुना रासायनिक प्रत्यंतरासाठी घेवून उर्वरीत मुद्देमाल जप्त केला. त्यांनी नि.क्र.पी१/पीडब्ल्यू१ आरोपीविरूध्द फिर्याद दाखल केली.

**५.** सदर साक्षीदाराने आपल्या उलटतपासात कबुल केले आहे की, नाटळ, बौध्दवाडी येथे दाट लोकवस्ती व रहदारी आहे. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, या दोन्ही पंचांनी राज्य उत्पादन शुल्कच्या अन्य काही कामांमध्ये पंच म्हणून काम केले आहे. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, घटनास्थळावरील घर कोणाचे मालकीचे आहे याबाबत त्यांना माहिती नाही. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, जप्त मुद्देमाल न्यायालयासमक्ष हजर करण्यात आलेला नाही. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, छापा टाकण्यापुर्वी बनावट

ग्राहक पाठवून खात्री केली नाही. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, छापा टाकतेवेळी अंगझडती दिली नाही. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, पंचांना हजर राहण्याकरीता लेखी नोटीस दिली नाही.

**०६.** अभियोगपक्षाचे पंच साक्षीदार क्र. २ सल्लाउद्दीन खान यांनी आपल्या पुराव्यात सांगितले आहे की, दि.१५/११/२०२४ रोजी ते निरीक्षक साहेब, त्यांचा इतर स्टाफ व दुसरा पंच यांचेसोबत खाजगी वाहनाने नाटळ, बौध्दवाडी, ता.कणकवली येथे गेले होते. सदर ठिकाणी आरोपी आपल्या राहत्या घराजवळ अवैध दारुची विक्री करतो अशी सदर कार्यालयातील अधिकारी यांना अशी माहिती मिळाली होती. त्यानुसार, ते दुय्यम निरीक्षक, इतर स्टाफ व पंच असे घटनास्थळी गेले व छापा घातला असता आरोपी आपल्या पुढ्यात एक तागाची पिशवी घेऊन बसलेला दिसला. सदर पिशवीची त्यांच्यासमक्ष खात्री केली असता, त्यात हनी ब्लेंड ब्रॅण्डीच्या १८० मिली मापाच्या सीलबंद १३३ बाटल्या मिळून आल्या. आरोपीस त्याचे नाव गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव रविकांत अनंत तांबे असे सांगितले. सदरचा मुद्देमाल दु.निरिक्षक यांनी दोन १८० मिली मापाच्या बाटल्या रासायनिक परिक्षणाकरीता घेवून नि.क्र.पी२/पीडब्ल्यू२ वरील घटनास्थळ वजा मुद्देमाल जप्ती पंचनामा तयार केला.

**०७.** साक्षीदाराने उलटतपासात असे मान्य केले आहे की, नाटळ, बौध्दवाडी येथे दाट लोकवस्ती व लागून लागून घरे आहेत. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, त्यांनी अनेक केसेसमध्ये पंच म्हणून काम पाहिले आहे व साक्ष दिली आहे. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, जप्त मुद्देमाल नमुना बाटली न्यायालयात हजर करण्यात आलेली नाही. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, घटनास्थळ कोणाच्या मालकीचे आहे हे त्यांना माहिती नाही.

त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, त्यांचा रिक्षा व्यवसाय असल्याने त्यांना घटनास्थळ परीसराची माहिहती आहे. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, त्यांना कोणाचेही आधारकार्ड पाहण्याचा प्रसंग आला नाही.

०८. अभिलेखावरील सर्व तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे सविस्तर अवलोकन करण्यात आले. अभियोग पक्षाचे असे प्रकरण आहे की, आरोपीच्या ताब्यात गोवा बनावटीच्या हनी ब्लेंड ब्रॅण्डीच्या १८० मिली मापाच्या १३३ सीलबंद बाटल्या मिळून आल्या होत्या. सदर मुद्देमाल जप्त करण्यात आला होता व त्यातील दोन नमुना बाटल्या रासायनिक परीक्षण नमुना म्हणून वेगळया काढण्यात आल्या होत्या. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, सदर रासायनिक परीक्षण नमुना रासायनिक परीक्षण कार्यशाळा येथे पाठविल्याबाबतचे पत्र अभिलेखावर दाखल करण्यात आले आहे. परंतु आवश्यक असणारा रासायनिक प्रत्यंतराचा अहवाल याकामी दाखल करण्यात आला नाही. परिणामतः जप्त झालेला तथाकथित मुद्देमाल दारु होता किंवा कसे, याबाबत संभ्रम निर्माण झालेला आहे.

०९. अभिलेखावरुन असे दिसुन येते की, आरोपीला प्रस्तुत प्रकरणातील गुन्हयाशी जोडणारा पुरावा अभिलेखावर नाही. तसेच इतर कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. त्यामुळे, आरोपीच्या ताब्यातून गोवा बनावटीच्या दारुचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता, याबाबत कोणताही विश्वासार्ह व स्पष्ट पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे, आरोपी गैरकायदेशिरपणे विना परवाना गोवा बनावटीच्या दारुची विक्री करण्याकरीता गोवा बनावटीची दारु सोबत बाळगुन होती हे तथ्य सिध्द करण्यास अभियोग पक्ष पुर्णतः अयशस्वी ठरलेले आहे.

**१०.** मी यापुर्वी नमुद केल्याप्रमाणे अभियोग पक्षाने दिलेल्या पुराव्यावरुन आरोपीवर ठेवण्यात आलेल्या आरोपाला आवश्यक असलेल्या सर्व घटकांची पुर्तता होत नाही. इतर साक्षीदारांना तपासण्यात आलेले नाही. रासायनिक परीक्षण अहवाल अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नाही. अभियोगपक्ष आरोपी विरुध्द निःसंशयपणे गुन्हा सिध्द करु शकलेला नाही. म्हणून मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नाही म्हणून देण्यात येतो.

**मुद्दा क्र. २ करीताः–**

**११.** वरील कारणमिमांसेचा सारांश असा आहे की, आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. मुद्दा क्र. १ च्या निष्कर्षावरुन, मुद्दा क्र. २ करीता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| **आदेश** | |
|---|---|
| १. | आरोपी रविकांत अनंत तांबे यास भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७८(१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) च्या आरोपातुन निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपीचा जात मुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | अपिल कालावधीनंतर निरिक्षक राज्य उत्पादन शुल्क, कणकवली यांचेकडे जप्त असलेला मुद्देमाल त्यांनी तो मुद्देमाल महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ९८ प्रमाणे नाश करणेत यावा. |
| ४. | या न्यायनिर्णयाविरुध्द अपील झाल्यास अपीलिय न्यायालयात हजर राहणेसाठी आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१(१) प्रमाणे रुपये १५,०००/– चा वैयक्तिक जातमुचलका द्यावा. |

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात टंकलिखित करुन जाहिर करण्यात आला.

SHUBHAM GOVIND LATURIYA
Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA
Date: 2026.06.09 17:36:44 +0530

(शुभम जी. लटुरिया)
न्यायदंडाधिकारी वर्ग १
कणकवली.

दिनांकः ०९.०६.२०२६